Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 31 – 34

DOI: 10.5281/zenodo.8330230

Original Research Article

# हैद्राबाद मुक्ती लढ्यात आर्य समाजाचे योगदान

डॉ. शारदा गोविंदराव बंडे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय. पूर्णा (जं.) ता. पूर्णा जि. परभणी ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: dr.shardabande17400@gmail.com

Received: 08 September, 2023 | Accepted: 11 September, 2023 | Published: 13 September, 2023

## प्रस्तावना

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. परंतु निजामाने आपले राज्य स्वतंत्र ठेवण्याची घोषणा केली. निजाम अन्यायी व अत्याचारी होता. याशिवाय देशाच्या मध्यभागी असलेले 'हैद्राबाद राज्य' स्वतंत्र राहणे देशाच्या आणि जनतेच्या हिताचे नव्हते. त्यामुळे हैद्राबाद राज्याच्या विलिनीकरणासाठी या राज्यातील जनतेने ७ ऑगस्ट १९४७ पासून संघटितपणे आंदोलनास सुरूवात केली.

**महत्त्वाचे शब्द:** मराठवाडा मुक्ती संग्राम, हैद्राबाद मुक्ती लढा, आर्य समाज

## आर्य समाजाची स्थापना

स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी सर्वप्रथम मुंबई येथे 'आर्य समाज' या संघटनेची स्थापना केली. इ.स. १८८० मध्ये हैद्राबाद संस्थानात मराठवाड्यातील बीड जिल्हा ता. किल्ले धारूर या ठिकाणी सर्वप्रथम आर्य समाजाची स्थापना झाली. पुढे १८८२ मध्ये या आर्य समाजाच्या शाखेचे स्थलांतर हैद्राबाद येथे 'सुलतानबझार' या ठिकाणी करण्यात आली. खऱ्या अर्थाने येथूनच आर्य समाजाच्या कार्याची सुरूवात झाली. १९३० मध्ये संस्थानातील प्रत्येक जिल्ह्यात आर्य समाजाच्या शाखा व्यापक करण्यात आल्या.

## आंदोलनाची पायाभरणी

हैद्राबाद संस्थानाच्या स्वातंत्र्य आंदोलनाची उभारणी करण्याचे महत्त्वाचे कार्य आर्य समाजानेच केले. संस्थानातील जनतेने जनजागृती करून आंदोलनाची पायाभरणी केली नसती तर संस्थानातील संपूर्ण समाज हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनात पेटून उठला नसता. सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणणे हे आर्य समाजाचे मूळ कार्य होते. हिंदू समाजात अस्मिता जागृत ठेवण्याचे कार्य आर्य समाजानेच केले. आर्य समाजानेच सर्वप्रथम हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाचे रणशिंग फुंकले. आर्य समाजाने पायाभरणी केली नसती तर स्टेट कॉंग्रेसच्या आंदोलनाला समाजाच्या सर्व स्तरातून पाठिंबा मिळाला नसता.

**समाज जागृतीचे कार्य**

संस्थानातील हिंदू समाजात धार्मिक व राजकीय जाग्रती करण्याचे महान कार्य आर्य समाजानेच केले. समाजात राजकीय जागृती झाल्याशिवाय तो अन्याय व अत्याचाराविरोधात पेटून उठत नसतो. आर्य समाजाने केलेल्या जनजागृतीमुळेच हिंदू समाज निजाम सरकारविरूद्ध उद्रेकाने पेटून उठला. उदगीरचे भाई बन्सीलालजी याने उदगीरला आपले मुख्य कार्यालय उघडले. त्यांनी 'वैदिक संदेश' या नावाचे वृत्तपत्र सोलापूर येथून प्रसिद्ध करण्यात आले. सोलापूर येथून 'सुदर्शन' हे आर्य समाजाचे मुखपत्र प्रसिद्ध होत होते. हैद्राबाद येथून 'वैदिक आदर्श' हे साप्ताहिक पंडित नरेंद्रजी प्रसिद्ध करीत होते. या वृत्तपत्राद्वारे त्यांनी समाजात जागृती घडवून आणली व लोकांना संघटीत केले.

**सामाजिक व धार्मिक सुधारणा**

आर्य समाजाने केलेल्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणा व कार्यामुळे संस्थानात एक राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. हिंदू धर्माला प्राप्त झालेले विकृत स्वरूप नाहीसे करणे, वैदिक धर्माचे पुनर्रूजीवन करणे, वेदाध्ययनाचा अधिकार समाजातील सर्व जातींना देणे, यज्ञविधी व संस्कार करण्याचा अधिकार सर्व जातींना देणे ईत्यादी कार्यक्रम आर्य समाजाने राबविले. आर्य समाजाची दारे सर्व जातीसाठी खुली झाली.

**निजाम सरकारला उघडपणे विरोध**

निजाम सरकारला उघडपणे विरोध सर्वप्रथम करण्याचे धाडस आर्य समाज या संघटनेने केले. आर्य समाजाने ठिकठिकाणी आर्य समाजमंदिरे, व्यायामशाळा व वाचनालये काढली होती. आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी गावोगाव फिरून हिंदूना वैदिक धर्माच्या ध्वजाखाली एकत्रित केले. खाकसार पार्टी, निजामसेना, रझाकार व इत्तेहादूल पार्टी यांच्याकडून आक्रमण होणार असल्याची बातमी आली की आर्य समाज मंदिरातील घंटा वाजू लागले. घंटेचा आवाज ऐकताच प्रत्येक घरातील पुरूष व तरूण मुले काठ्या, कुऱ्हाडी, भाले, बर्चा, तलवारी व बंदूका घेवून त्यांना लढा देण्यास तयार राहत असत.

**सरकारच्या दडपशाहीस व अत्याचारास प्रतिकार**

आर्य समाजाच्या कार्यामुळे लोक निजामाच्या विरोधात दंड थोपटूल उठले. त्यामुळे सरकारने आर्य समाजाची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. सरकारने १२ एप्रिल १९३४ रोजी एक परिपत्रक काढून सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय आर्य समाजाने कसलाही प्रचार व उपदेश करू नये असा आदेश काढला. २३ जानेवारी व २९ एप्रिल १९३४ रोजी पुन्हा दोन परिपत्रके काढून आर्य समाज मंदिराच्या बाहेर व सार्वजनिक सभा घेण्यास बंधने घातली. निजाम सेना, रझाकार व पोलिसांनी आर्य समाज मंदिर, यज्ञ हवनकुंड यावर सशस्त्र हल्ले करून ते उद्वस्त करण्यास प्रारंभ केला. तेव्हा शेषराव वाघमारे हे आपल्या सहकार्यासह या अत्याचाराचा बदला घेण्यासाठी सशस्त्र पेटून उठले. 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ बाळगण्यास मनाई करण्यात आली.

इ.स. १९२५ मध्ये 'वैदिक आदर्श' या नियतकालीकावर बंदी घातली. अरबाने राधाकृष्ण मारवाडी या कार्यकर्त्याचा भरदिवसा खून केला. काहींना राज्याबाहेर हाकलून लावले. १९३२ साली हिंदू मंदिर पाडून तिथे मस्जिद बांधण्याचे काम सुरू केले. तेव्हा आर्य समाजाच्या लोकांनी मस्जिदीचा ओठा पाडून टाकला. तेवढ्यात रामा मांग या आर्य समाजाच्या व्यक्तीने पठाण, रझाकार या अरबांना धमकी देवून त्यांचे मुडदे पाडण्यास सुरूवात केली. त्याने चार पठाण व एक अरबांना ठार केले.

**हैद्राबाद स्टुडंट्स युनियनचे कार्य**

सोलापूर हे ठिकाण शैक्षणिक आणि आर्थिक दृष्टीने सोयीचे असल्यामुळे मराठवाड्यातील बरेच विद्यार्थी शिक्षणासाठी तेथील दयानंद कॉलेजात जात असत. इंग्रज आणि निजामाविरूद्ध पुकारलेल्या स्वांत्र्य आंदोलनास तरूणांना प्रेरणा देण्याचे काम याच कॉलेजने केले. या कॉलेजचे प्राचार्य श्रीराम शर्मा यांनी विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व धर्मप्रेम निर्माण केले. त्यांनी अन्यायाविरूद्ध लढण्याची शक्ती व प्रेरणा विद्यार्थ्यात निर्माण केली. या कॉलेजातील विद्यार्थी आर्य समाजाच्या विचारांनी भारावलेले होते. त्यांनी 'हैद्राबाद स्टुडंट्स युनियन' या संघटनेची स्थापना केली होती.

**आर्य समाजाचा सत्याग्रह १९३८**

आर्य समाजाच्या सामाजिक आणि धार्मिक कार्यामुळे राजकीय चळवळ उदयास येत असल्याचे पाहून निजामाची वाकडी नजर आर्य समाजाकडे वळली. आर्य समाजाचा प्रभाव वाढू लागला. तेव्हा राज्यात आर्य समाज स्थापन करू नये असा निजामाने आदेश काढला. विविध रूपाने आर्य समाजावर निर्बंध लावण्यात आले. त्यामुळे संपूर्ण जनतेत निजामाबद्दल चिड निर्माण झाली. सरकारच्या या दडपशाहीच्या निषेधार्थ २ डिसेंबर १९३४ रोजी हैद्राबादला सत्याग्रह केला. आर्य समाजाची दिक्षा घेतलेल्या सरकारी नोकरांना आणि जे सरकारी नोकर आर्य समाजी व्यक्तीशी संपर्क ठेवतील अशांनाही नोकरीतून कमी करण्याचे आदेश निजामाने केले.

**स्वातंत्र्य संग्रामातील पहिले बलिदान**

१९३४ पासून संस्थानात आर्य समाज संघटनेचे कार्य गतिमान झाले होते. आर्य समाजाचे कार्यकर्ते ठिकठिकाणी जावून हिंदूना जागृत करून निजाम सत्तेविरूद्ध लढा देण्यास प्रवृत्त करीत होते. याशिवाय बसवकल्याण, लातूर व निलंगा येथील आर्य समाजी कार्यकर्ते गावोगावी जावून आर्य समाजाची स्थापना करीत होते. दोन हजार समाजी कार्यकर्ते संस्थानात पठाणी पोषाखात प्रचार करीत वावरत होते. तसेच निजामाला व रझाकाराला प्रतिकार करू शकणारी एक तरूणांची फळी तयार केली. या तरूणापैकीच एक म्हणजे 'वेदप्रकाशजी आर्य' हे होते. वेदप्रकाशजीचे काम पाहून निजाम व रझाकार त्यांना ठार मारण्याच्या संधीची वाट पाहू लागले. दगाबाजाच्या षडयंत्राने अरब व पठाणांनी त्यांचा खून केला. स्वातंत्र्य संग्रामातील हे पहिले हुतात्मा झाले. त्यांच्या खुनामुळे आर्य समाजाचे आंदोलन थंड होण्याऐवजी तीव्र झाले.

अशा प्रकारे हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाने व्यापक स्वरूपाचे कार्य केले. आर्य समाजानेच सर्वप्रथम सत्याग्रह लढ्याचे रणशिंग फुंकले आणि स्वातंत्र्यासाठी प्रभावीपणे संघर्ष केला. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात आर्य समाज आघाडीवर राहिला. स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाची कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहावी अशी आहे. आर्य समाजाच्या नेत्यांनी स्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान हे प्रेरणादायी व आदर्श आहे असे म्हणावे लागले.

**संदर्भग्रंथ सूची**


१. डॉ. अनिल कठारे व डॉ. एन. एन. नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, नोव्हेंबर १९९९

२. डॉ. आर. एस. कोंडेकर – मराठवाड्याचा इतिहास, अरूणा प्रकाशन, लातूर, १७ सप्टेंबर २०१३

३. डॉ. पी. जी. जोशी – मुक्तीगाथा – मुक्तीदाता, क्रिएटीव्ह पब्लिकेशन्स, नांदेड, सप्टेंबर २००९

४. श्री अनंत भालेराव – हैद्राबादचा स्वांत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, १९८७